डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
कृषि महाविद्यालय,दापोली
कृषि अर्थशास्त्र विभाग,
दापोली जि. रत्नागिरी

जा.क्र कृमविदा/अर्थ/३४३ /२०२३, दिनांक 24 JUL 2023

# जाहिरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि अर्थशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय,दापोली या विभागात (Economic Impact of Investment in Cashew Research in Konkan Region of Maharashtra) या योजनेमध्ये ''निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात'' खाली दिलेल्या तपशिलप्रमाणे पद भरण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतींसह पात्र उमेदवारांचे दि. ०८/०८/२०२३ रोजी सकाळी ११.०० पर्यंत प्रत्यक्ष थेट मुलाखत घेण्यात येईल. तसेच अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी सकाळी ०९.०० वाजता या वेळेत होईल तरी सदर मुलाखतीस उपस्थित रहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन प्रति महिना (रु) | नेमणूकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ संशोधन छात्र (SRF) | ०१ | १५,०००/- | ११ महिने |

पदासाठी पात्रता –

| | |
|---|---|
| वरिष्ठ संशोधन छात्र (SRF) | एम.एमसी. (कृषि अर्थशास्त्र)/<br>पीएच.डी (कृषि अर्थशास्त्र)<br>(भाकृअप नेट उत्तीर्ण असल्यास प्राधान्य) |

**: तात्पुरत्या वरिष्ठ संशोधन छात्र (SRF) नेमणुकीसाठी जाहीरातीमध्ये नमूद करावयाच्या अटी व शर्ती :**

१. वयोमर्यादा – खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता ३८ वर्ष व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरिता ४३ वर्षे राहील.
२. उमेदवाराने विहित नमुन्यातील पूर्ण तपशिल भरुन अर्ज मा. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली यांचे नावे या कार्यालयात सादर करावा.
३. लखोटयावर वरिष्ठ संशोधन छात्र या पदासाठी अर्ज राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग प्रकल्पातर्गत कोकण विभागामध्ये काजू संशोधनासाठी केलेल्या निधीच्या गुंतवणुकीमधून झालेला आर्थिक परिणाम अभ्यासणे **(Economic Impact of Investment in Cashew Research in Konkan Region of Maharashtra)** प्रकल्प असे लिहिलेले असावे.
४. पात्र उमेदवारांची निवड समितीव्दारे मुलाखत घेण्यात येईल.
५. मुलाखतीच्यावेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.
६. मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता देय केला जाणार नाही.
७. निवडलेल्या उमेदवारांने रु १०० किमंतीच्या स्टॅम्प पेपरवर नियुक्ती कालावधी दरम्यान तो नोकरी सोडणार नाही आणि नेमुन दिलेले काम पूर्ण करेल आणि तो नियमित नियुक्तीसाठी दावा करणार नाही असे हमीपत्र देणे आवश्यक राहील.
८. उमेदवाराला प्रकल्पातील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियमीत आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

९. उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सूचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

१०. उमेदवाराचा अर्ज नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे आहे.

११. निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जेथे योजना कार्यरत आहे. तेथे नियुक्ती देण्यात येईल.

१२. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ ९.०० ते १७.३० अशी राहील तथापि, एखाद्या दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होईपर्यंत थांबावे लागेल किंवा काम पूर्ण करण्यासाठी लवकर यावे लागेल.

१३. सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१४. जादा काम केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही. प्रकल्प कालावधी बरोबरच सर्व आर्थिक लाभ अथवा पदावरील सेवा देय राहणार नाहीत आणि संपुष्टात येतील

१५. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार संबंधितांना राहतील.

१६. सदर तात्पुरती नियुक्ती अकरा महिने किंवा प्रकल्प / योजना संपण्याच्या कालावधी यामध्ये जो कालावधी आधी असेल त्या कालावधीकरीता राहील. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या नियुक्त्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१७. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र एसएलपी-५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

१८. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणूक रद्द होऊ शकते.

१९. कोणत्याही टपाल विलंबासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२०. कोणत्याही स्वरुपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरवले जाईल.

२१. लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना - अ मध्ये अर्जासोबत सादर करावे.

२२. वयाचा लाभ / फायदा उमेदवाराकडून नॉनक्रिमीलेअर / जातीचा दाखला देणे आवश्यक राहील.

२३. नावामध्ये बदल असल्यास गॅझेट राजपत्र जोडण्यात यावे.

२४. जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

२५. प्रमाणपत्रे सत्यप्रतीत / स्वयंसाक्षांकीत असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक राहील.

२६. अर्जावर उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा.

प्रकल्प प्रमुख
राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग
प्रकल्पातर्गत कोकण विभागामध्ये काजू संशोधनासाठी
केलेल्या निधीच्या गुंतवणुकीमधून झालेला आर्थिक परिणाम अभ्यासणे

प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी –

१. प्रभारी अधिकारी, ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली जि. रत्नागिरी

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द करण्यात यावी.

३. सर्व सुचना फलक